**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २४ ऑक्टोबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला वेग; अमरावती मधून काँग्रेसच्या यशोमती ठाकूर, गोंदियातून भाजपचे विनोद अग्रवाल तर दिग्रस मधून मंत्री संजय राठोड यांचे अर्ज दाखल.**
2. **बहुजन समाज पार्टीद्वारे आज विधानसभा निवडणुकीसाठी ६२ उमेदवारांची पहिली यादी जारी.**
3. **रस्ते बांधणीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणं आवश्यक असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन.**
4. **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संशोधकांनी शोधली अँटीमायक्रोबियल गुणधर्म असलेली कृत्रिम त्वचा.**

अर्ज दाखल

राज्य विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. आज जवळपास सर्वच पक्षांच्या अनेक उमेदवारानीं अर्ज दाखल केले. २९ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत. अमरावती जिल्ह्यातील तिवसा मतदारसंघात काँग्रेच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांनी आज नामांकन रॅलीला संबोधित केल्यानंतर नामांकन अर्ज भरला. याशिवाय गोंदिया विधानसभा क्षेत्राचे आमदार विनोद अग्रवाल यांना महायुतीच्या वतीने गोंदिया विधानसभेची सीट मिळाल्याने विनोद अग्रवाल यांनी शक्ती प्रदर्शन करित गोंदिया उप विभागीय अधिकारी कार्यलयात विधानसभा निवडणुकीचा नामांकन अर्ज दाखल केला आहे. यवतमाळच्या दिग्रस मतदारसंघातून मंत्री संजय राठोड यांनी महायुतीतील शिवसेनेकडून उमेदवारी अर्ज दाखल केला. तर राळेगाव मतदारसंघातुन भाजपचे आमदार माजी मंत्री अशोक उईके यांनी नामांकन अर्ज दाखल केला. राज्यभरात येवल्यामधून राष्ट्रवादी काँग्रेसचे छगन भुजबळ, आणि आंबेगाव मधून दिलीप वळसे पाटील, तर कोथरुड मधून भाजपचे चंद्रकांत पाटील, शिर्डी इथून राधाकृष्ण विखे पाटील, मुंबईत मलबार हिल्स इथून मंगलप्रभात लोढा, तर कांदिवली पूर्व मधून अतुल भातखळकर या भाजपच्या उमेदवारांनी देखील आज अर्ज दाखल केले. इंदापूर मधून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांनी आज अर्ज दाखल केला. खासदार सुप्रिया सुळे यावेळी उपस्थित होत्या. याशिवाय महाविकास आघाडीकडून कळवा -मुंब्रा विधानसभा मतदारसंघातून जितेंद्र आव्हाड, वरळी मतदारसंघातून आदित्य ठाकरे, तर इस्लामपूर मतदातसंघातून जयंत पाटील यांनी अर्ज दाखल केला. दरम्यान, उमेदवारी अर्ज भरण्याच्या कालच्या दुसऱ्या दिवशी १५३ उमेदवारांचे १६४ अर्ज दाखल झाल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं कळवलं आहे.

बहुजन समाज पार्टी पहिली यादी

बहुजन समाज पार्टी द्वारे आज महाराष्ट्रातल्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीसाठी ६२ उमेदवारांची पहिली यादी जारी करण्यात आली आहे. यात बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव मधून विजय वाघमारे, अकोला जिल्ह्यातील बाळापुर मधून भाग्यश्री गवई, अकोला पश्चिम मतदारसंघातून डॉक्टर धनंजय नालट, अकोला पूर्व मतदारसंघातून तुषार शिरसाट तर मुर्तीजापुर मतदार संघातून रमेश इंगळे, अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे मधून योगेंद्र पाटील तर दर्यापूर मधून नागोराव हंबर्डे आणि मेळघाट मधून मोतीलाल ठाकरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नागपूर उत्तर मधून बुद्धम राऊत तर यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड मधून सुभाष रणवीर यांना उमेदवारी दिली आहे.

महायुतीत बंडखोरी

नागपुरात महायुतीत बंडखोरी झाली असल्याचं वृत्त असून, अजित पवार गटाच्या आभा पांडे यांनी पूर्व नागपूरातून अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज सादर केला आहे. आभा पांडे या महिला आयोगाच्या सदस्य आहेत आणि माजी नगरसेविका आहे. आपली प्रमुख लढत भाजपच्या उमेदवाराविरुद्ध असल्याचं आभा पांडे यांनी सांगितलं. भाजपने पूर्व नागपूर विधानसभा मतदारसंघात कृष्णा खोपडे यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

बाबा सिद्दीकी

माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात लॉरेन्स बिश्नोई टोळीशी संबंधित प्रवीण लोणकरला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. प्रवीण लोणकरचा भाऊ शुभम हा अद्यापही फरार असून पोलिस त्याच्या शोधात आहेत. शुभमच्या संपर्कात असलेल्या चौघांना मुंबई पोलिसांनी काल चौकशीसाठी ताब्यात घेतलं होतं, तर पुण्यातून आणखी तिघांना काल रात्री ताब्यात घेतलं आहे.

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी नागपूर इथं सात आठवड्यांच्या अभिमुखता कार्यक्रमाचा समारोप उद्या 25 ऑक्टोबर रोजी होणार असून या कार्यक्रमाला सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश जस्टीस व्ही एस शिरपूरकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. उत्तरायण 2024 अंतर्गत नुकत्याच नव्याने पदोन्नती मिळालेल्या ११६ सह आयकर सहआयुक्तांचा सात आठवड्यांचा अभिमुखता कार्यक्रम संपन्न झाला.

मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या २७ तारखेला आकाशवाणी वरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११५ वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरीकांनी आपल्या सूचना आणि विचार उद्या २५ तारखेपर्यंत एक आठ शून्य शून्य एक एक सात आठ शून्य शून्य या नि:शुल्क क्रमांकावर,

मायजीओव्ही ओपन फोरम वर किंवा नमो ॲप वर नोंदवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

रस्ते सुरक्षेसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेसारख्या सर्व प्रकारच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सरकार करत आहे, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं. नवी दिल्ली इथं १२ व्या ट्रॅफिक इन्फ्राटेक एक्स्पोला ते संबोधित करत होते. रस्ते बांधणीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणं आवश्यक आहे हे त्यांनी यावेळी अधोरेखित केलं. रस्ते बांधणीसाठीच्या आधुनिक पद्धती मांडण्यासाठी सरकार अभियंत्यांना प्रोत्साहन देत आहे, असंही गडकरी म्हणाले. राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरण बांधत असलेल्या रस्त्यांमुळे अपघातांचं प्रमाण कमी होईल, अपघातांचं प्रमाण कमी करण्यासाठी सरकार खासगी क्षेत्रातल्या तज्ज्ञांची नियुक्ती करत आहे, असं गडकरी यांनी सांगितलं. रस्त्याची गुणवत्ता राखणारी, कायद्याची अंमलबजावणी करणारी आणि पथनाक्यांचं व्यवस्थापन करणारी प्रणाली विकसित करण्याचा प्रयत्न हे तज्ज्ञ करतील असं गडकरी म्हणाले.

कृत्रिम त्वचा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मॉलिक्युलर बायोलॉजी विभागातील संशोधकांनी अँटीमायक्रोबियल गुणधर्म असलेली कृत्रिम त्वचा शोधून काढली आहे. या संशोधनामुळ आता जखमेवर मलमपट्टी न करता कृत्रिम त्वचाच लावता येणार आहे. विद्यापीठाच्या मॉलिक्युलर बायोलॉजी विभाग प्रमुख डॉ.दयानंद गोगले आणि लक्ष्मीनारायण इन्स्टिटयूट च्या बायोटेक्नॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. आरती शनवारे यांनी प्रकल्प प्रमुख डॉ.बिपिन लाडे यांच्या मदतीन हे संशोधनकार्य पूर्ण केलं आहे. जखम झालेल्या जागेवर पट्टीच्या ऐवजी या कृत्रिम त्वचेचा तुकडा लावल्यान जखम सुकेल आणि बरी होईल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. जखम झालेल्या ठिकाणी कमी वेळात नैसर्गिक त्वचा येण्यासही या संशोधनामुळे मदत होणार आहे. शिवाय ही त्वचा जैवविघटनशील असल्यान त्यातून दीर्घकाळ टिकणाऱ्या कचऱ्याचा प्रश्नही निर्माण होणार नाही.

टपाली मतदान

विधानसभा निवडणूक करीता प्रत्येक मतदारांनी निवडणूक प्रक्रियेत सहभाग नोंदवून जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी आयोगाच्या वतीनं निवडणूक कर्तव्यावर असलेल्या अधिकारी आणि कर्मचा-याकरीता टपाली मतदान, 85 वर्षावरील मतदार आणि 40 टक्क्यावरील दिव्यांग मतदारांकरीता गृहमतदान सुविधा यांसह, इतर दिव्यांग मतदारांकरीता मतदान केंद्रावर विशेष सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे. या सुविधांचा मतदारांनी लाभ घ्यावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.निवडणुकांच्या कामात कर्तव्यावर असणारे महसूल विभाग, पोलीस विभाग, जिल्हा

परिषद विभाग तसच इतर शासकीय कार्यालयातील अधिकारी आणि / कर्मचारी यांनाही मतदान केंद्रात जाऊन मतदान करण शक्य होत नसल्यास टपाली मतदानाची सोय उपलब्ध करण्यात येणार आहे. त्याकरीता विभाग प्रमुखांनी टपाली मतपत्रिका मागणीसाठी नमुना 12 दिनांक 30 ऑक्टोंबर पर्यंत पूर्णतः भरुन द्यायचे आहे.

मतदान जागृती

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीन आणि जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी वर्धा जिल्ह्यातील 1 हजार 273 शाळेतील 1 लाख 35 हजार 503 विद्यार्थ्यांनी आपल्या पालक आणि नातेवाईकांना पत्र लिहून विधानसभा निवडणुकीत भय मुक्त वातावरणात कोणत्याही दबावाला, आमिशाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करण्याचं आवाहन केलं.

कसोटी क्रिकेट

न्यूझीलंड विरूद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्याला आज पुणे इथं सुरुवात झाली. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सलामीला उतरलेल्या कर्णधार टॉम लॅथम आणि डेव्हॉन कॉनवे यांनी पहिल्या विकेटसाठी ३२ धावांची भागीदारी केली. आर. अश्विनन लॅथमला बाद केल्यानंतर फलंदाजीला आलेल्या विल यंग यालाही अवघ्या १८ धावांवर बाद केलं. त्यानंतर कॉनवे अवघ्या ७६ धावांवर झेलबाद झाला.न्यूझीलंडच्या सर्वबाद २५९ धावा झाल्या होत्या. भारतान आज खेळायला सुरवात केली असून, दिवसाअखेर भारताच्या १ गडी बाद सोळा धावा झाल्या आहेत.

'आढावा विधानसभा मतदारसंघांचा'

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज मुंबई पश्चिम उपनगरातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****